राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत राज्यातील ३४ जिल्हयांसाठी मनोविकारावरील औषधे खरेदीस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०२१९/प्र.क्र.१३२/आरोग्य-७

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : १५ मार्च, २०१९.

वाचा :-

१. अतिरिक्त संचालक (आरोग्य संस्थांमार्फत राबविण्यांत येणारे कार्यक्रम) आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/माआ/टे-३/जीमाआका/ साय.औ.खरेदी/ ४०६८-७०/ २०१९, दिनांक १५/०२/२०१९.
२. अतिरिक्त संचालक (आरोग्य संस्थांमार्फत राबविण्यांत येणारे कार्यक्रम) आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/माआ/टे-३/जीमाआका/साय.औ.खरेदी/४३३२-३३/२०१९, दिनांक ०५/०३/२०१९.
३. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.प्रशामा-१०१८/प्र.क्र.५२८/आरोग्य-७, दिनांक ११/१२/२०१८.

प्रस्तावना :-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत राज्यातील ३४ जिल्हयांसाठी मनोविकारावरील औषधे खरेदी करण्यासाठी एकूण रूपये १६४.९४ लक्ष इतक्या रक्कमेच्या खरेदीस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ या वर्षाकरीता जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अंतर्गत राज्यातील ३४ जिल्हयांसाठी मनोविकारावरील (सायकॅट्रीक) औषधे खरेदी करण्यासाठी FMR Code ६.२.१६.१ नूसार रुपये २७५.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी रु.१६५.०० लक्ष इतके अनुदान राज्यस्तरावर ठेवण्यांत आलेले आहे. त्या

अनुदानातून राज्यस्तरावरुन २३ प्रकारच्या मनोविकारावरील औषधे खरेदीसाठी यापुर्वी शासनाकडे प्रशासकीय मान्यता करीता प्रस्ताव सादर करण्यांत आला होता. त्यानुषंगाने शासनाकडून दि.११.१२.२०१८ रोजी खरेदीसाठी प्रशासकीय मान्यता निर्गमित करण्यात आलेली आहे. तथापि, राज्यस्तरावरुन शासनाकडे सादर झालेल्या प्रस्तावात काही तांत्रिक त्रुटी आढळल्यामुळे पुढील खरेदीची कार्यवाही न करता राज्यस्तरावरुन औषधे खरेदीचा सुधारीत प्रस्ताव (२२ प्रकारच्या औषधांचा) संदर्भित पत्रान्वये अतिरिक्त संचालक, (आरोग्य संस्थांमार्फत राबविण्यांत येणारे कार्यक्रम) आरोग्य सेवा, मुंबई यांनी सादर केलेला आहे. सदर प्रकरणी शासनाने निर्गमित केलेला दि.११/१२/२०१८ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे व जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ करीता प्राप्त अनुदानातून सदरची मनोविकारावरील औषधे खरेदी करण्यासाठी रक्कम रुपये १६४.९४ लक्ष इतक्या अंदाजित रक्कमेच्या खरेदीसाठी खालील तपशिलानूसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

Sr. No	Med No	code	Name of the Item	Total Medicine demand (CS)	Total Medicine demand (DHO)	Total Medicine demand (CS+DHO)	RATE in Rs.	Total Cost in Rs.
1	234	30.2	Promethazine Inj 25 mg/ml 2 ml Amp [30.2]	108621	109700	218321	6.3	1375422
2	237	196.1	Carbamezapine Tab 100 mg [196.1]	588396	0	588396	0.84	494253
3	238	196.2	Carbamezapine Tab 200 mg [196.2]	1308987	0	1308987	0.96	1256628
4	241	194.1	Lorazepam Tab 2 mg [194.1]	1055506	182700	1238206	0.377	466804
5	244	190.1	Phenobarbitone Tab 30 mg [190.1]	781753	354244	1135997	0.53	602078
6	245	190.2	Phenobarbitone Tab 60 mg [190.2]	1053471	270659	1324130	1.96	2595295
7	323	200.1	Trihexyphenidyl Hydrochloride Tab 2 mg [200.1]	1566490	447787	2014277	0.2014	405675
8	340	385.2	Chlorpromazine Tab 50 mg [385.2]	1074831	0	1074831	0.63	676952
9	346	373.1	Escitalopram Tab 10 mg [373.1]	976510	193217	1169727	0.7665	896596
10	347	378.1	Fluoxetine Cap 20 mg [378.1]	1066835	285631	1352466	0.2745	371252
11	348	386.1	Fluphenazine Deconate Inj 25 mg [386.1]	5418	49018	54436	44.48	2421313
12	350	387.2	Haloperidol Inj 5 mg/ml 1 ml [387.2]	32430	0	32430	5.25	170258

13	353	379.1	Imipramine Tab 25 mg [379.1]	1319687	185052	1504739	0.2751	413954
14	355	383.1	Lithium Carbonate Tab 300 mg [383.1]	649948	0	649948	0.588	382169
15	359	391.2	Olanzapine Tab 10 mg [391.2]	1213727	0	1213727	0.39	473354
16	360	391.1	Olanzapine Tab 5 mg [391.1]	1124313	175957	1300270	0.41	533111
17	1135	20.1	Diazepam Tab 5 mg [20.1]	1048709	11360	1060069	0.4134	438233
18	1174	363.1	Respridone 2 mg [363.12]	1148405	247572	1395977	0.348	485800
19			Tab Diphenyhydantoin 100mgs	1639115	365699	2004814	0.21	421011
20		374.1	Clonazepam Tab 0.5 mg	24000	371073	395073	0.75	296305
21			Lorazepam Inj	1100	54860	55960	12.75	713490
22	350	387.2	Haloperidol Tab 5 mg[387.4]	0	115125	115125	5.25	604406
Total				**17788252**	**3419654**	**21207906**		**16494357**

सदरची प्रशासकीय मान्यता पुढील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१) सदर औषधी व साहित्य सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू औषधी व साहित्य सामुग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. पीआयपी मध्ये मंजूर असलेल्या बाबींच्या तांत्रिक विर्निदेशानुसार मागणीपत्र पाठविण्याची जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुखांची राहिल. प्रस्तावातील समाविष्ट असलेल्या बाबींचीच खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च सन २०१८-१९ PIP मधील FMR Code ६.२.१६.१ या घटकांतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. सदरची खरेदी प्रशासकीय मंजुरीच्या विहित कालावधीत पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.सदर प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.खरेदी -२०१६/प्र.क.२४०/आरोग्य-८ दिनांक २६ जुलै,२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई, संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये अवजारे, किरकोळ साधन सामग्री आणि उपक्रम संच विकत घेण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासनिक विभागास पूर्ण अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201903151228064917 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH MADHUKAR FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.15 16:37:41 +05'30'

(निलेश फाळके)

महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक (आरोग्य सेवा), राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) अतिरिक्त संचालक, (आरोग्य संस्था मार्फत राबविण्यांत येणारे कार्यक्रम), आरोग्य सेवा, मुंबई.
५) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
६) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
७) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
८) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
९) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
१०) निवडनस्ती (आरोग्य-७)